माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ/४१७१ /२०२३ /सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री. गणेश बंडाप्पा कलशेट्टी | १. जिल्हा ग्रंशालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर<br>२. नायब तहसिलदार, सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, जि. सोलापूर |

**( सुनावणी दिनांक- २०/०५/ २०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. ११/०७/२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल |
|---|---|
| २०/०३/२०२३ | कै. बसवेश्वर नरोळे सार्वजनिक वाचनालय लिंबी चिंचोळी, ता. द. सोलापूर येथील स्थापनेपासून ते आजतागायात प्राप्त झालेल्या राज्य व केद्र शासन निधीचा तपशील व कर्मचारी वेतन याचा तपशीलाची माहिती |

आजरोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती १ वर्षानंतर मिळाली.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जि. सोलापूर यांनी अपिलार्थीस माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्याचे आयोगासमोर अवगत केले.

आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जि. सोलापूर यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचा पुरावा दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत कलम ७(६) नुसार रजिस्टर्ड पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जि. सोलापूर यांनी माहिती अर्जावर विहित मुदतीत काहीही कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार र.रु. ५०००/- दंडात्मक कारवाई का करण्यात येवू नये ? याबाबतचा खुलासा दि.१८/०८/ २०२५ रोजी आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा क्रंथालय अधिकारी कार्यालय, जि.सोलापूर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ/४१७१/२०२३ /सोलापूर 8510/2025 दिनांक - 26/6/2025